# महाऊर्जास ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय पुरस्कार आणि देशात प्रथम स्थान




राज्यात ऊर्जा संवर्धन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेस ऊर्जा दक्षता ब्युरो, भारत सरकार, विद्युत मंत्रालय यांच्या मार्फत दि.१४ डिसेंबर, २०२४ रोजी आयोजित "National Energy Conservation Award - २०२४" मधील State Energy Efficiency Performance Award (Group -१) या वर्गवारीमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी देश पातळीवर हा पुरस्कार देण्यात येतो. सदर पुरस्कार विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे ऊर्जा संवर्धन दिनाचे औचित्य साधून दि.१४ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात मा. श्री. जगदीप धनखड़, उपराष्ट्रपती यांच्या उपस्थितीत मा. श्री. श्रीपाद नाईक, राज्यमंत्री, नवीन व नवीकरणीय ऊर्जा यांच्या शुभहस्ते डॉ. श्रीमती कादंबरी बलकवडे,भा.प्र.से. महासंचालक, महाऊर्जा यांनी स्विकारला.

महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धन अधिनियम २००१ च्या तरतुदींची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी महाऊर्जा या संस्थेस पदनिर्देशित संस्था म्हणून अधिसूचित केले आहे. तसेच अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाची महाऊर्जा ही राज्य मूलाधार संस्था आहे. ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षम उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महाऊर्जा आघाडीवर आहे.

महाऊर्जा व महावितरण मार्फत सौर कृषि पंपासाठी प्रधानमंत्री कुसुम घटक ब योजना राज्यात राबविण्यात येत असुन आजतागायत एकूण १,६३,९०६ सौर कृषि पंप आस्थापित करण्यात आले आहेत. राज्य सौर कृषी पंप आस्थापने मध्ये देशात प्रथम स्थानावर आहे.

राज्यात ५२२१ मेगावॅट क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प, ५०१९ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प, २६९० मेगावॅट क्षमतेचे ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प, २१५ मेगावॅट क्षमतेचे कृषि अवशेषांवर आधारीत प्रकल्प, ४१ मेगावॅट क्षमतेचे औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प, १७ मेगावॅट क्षमतेचे शहरी घन व द्रव कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प, आणि ३७० मेगावॅट क्षमतेचे लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प असे एकूण १३,५७३ मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने दि.३१/१२/२०२० रोजी अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० जाहीर केले असून त्यामध्ये मार्च २०२७ पर्यंत १७३६० मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० अंतर्गत एकुण ८०३४ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांमध्ये ६४६७ मेगावॅट क्षमतेच्या अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची नोंदणी करण्यात आली आहे. या धोरणांतर्गत एकूण ३४७४ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच मा. श्रीमती आभा शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्या मार्गदर्शनाखाली राज्या मध्ये ऊर्जा संवर्धन व अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यात येत आहे.


LiFE
राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कार 2024
14 दिसंबर, 2024, विज्ञान भवन, नई दिल्ली

